## महत्त्वाचे

### स्वाती देशमुख यांना पीएच. डी.



औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने स्वाती प्रल्हादराव देशमुख यांना प्राणीशास्त्र विषयामध्ये पीएच. डी. प्रदान केली. डॉ. सुनीता बोर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली 'डायव्हरसिटी ऑफ प्लान्ट निम्याटोड फ्रॉम औरंगाबाद डिस्ट्रिक्ट' या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला.

### मनपाखरु कविता संग्रहाचे प्रकाशन

औरंगाबाद: डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील केमिकल टेक्नॉलॉजीच्या प्राध्यापिका गौरी कल्लावर लिखित 'मनपाखरु ' या कवितासंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी फ.मुं.शिंदे यांच्या हस्ते रविवारी ( दि.२७) सकाळी ११ वाजता सूतगिरणी चौकातील इंडियाज रेड व्हेल्वेटमध्ये होणार आहे. या कार्यक्रमाला शिवा संघटनेचे प्रा. मनोहर धोंडे, माजी कुलगुरु डॉ.विलास सपकाळ, डॉ. सतीश बडवे, डॉ. शेख इक्बाल मिन्ने उपस्थित राहणार आहेत.

### मुलींसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा उत्साहात

औरंगाबाद : रोटरी क्लबच्या रोट्रॅक्ट क्लब ऑफ औरंगाबाद ॲचिवर्सच्या वतीने मुलींसाठी स्वसंरक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. चाटे स्कूलच्या प्रांगणात कार्यशाळा मोठ्या उत्साहात पार पडली. यामध्ये इयत्ता ६ वी ते १० वीच्या विद्यार्थिनींनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली स्वसंरक्षणाचे धडे गिरविले.

**नोटाबंदी :** ७०% व्यवहार ठप्प असल्याचा अंदाज

# आर्थिक उलाढाल; आलेख घसरला!

विकास राऊत ● औरंगाबाद

केंद्र सरकारच्या नोटाबंदीचा फटका मराठवाड्यातील आर्थिक उलाढालीला बसला आहे. नोटाबंदी झाल्यापासून १२ दिवसांत रोजचा अंदाजे १५० कोटींचा उलाढालीचा आलेख घसरला आहे. ३० टक्के म्हणजेच ४५ कोटींवर मराठवाड्यातील सर्व व्यवहार सुरु असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. १२ दिवसांत १८०० कोटींची उलाढाल अपेक्षित होती, परंतु ती चलन तुटवड्यामुळे ५४० कोटींवर आल्याचे व्यापारी वर्गातून सांगण्यात येत आहे.

नव्या चलनाचा तुटवडा आणि १ हजार व ५०० रुपयांच्या नोटाबंदीमुळे ३० टक्क्यांवर व्यवहार आले आहेत. पेट्रोलपंप, मेडिकल, हॉस्पिटल, ट्रान्सपोर्टचे थोडेफार व्यवहार चालू आहेत. बाकीचे सर्व व्यवहार ठप्प पडल्यातच जमा आहेत. सरकारच्या निर्णयामुळे सामान्य जनजीवनाची मोठ्या प्रमाणात कोंडी झाली असून ही कोंडी फोडण्यासाठी नवीन चलनाचा पुरवठा आणि बाजारात चिल्लर मोठ्या प्रमाणात आणणे हा एकमेव पर्याय असल्याचे दिसते आहे.

कृषी उत्पन्न बाजार समित्या, भाजीमंडई, किरकोळ दुकानदार, व्यापारी, शेतकरी, धान्य बाजार, किमान हमी किंमत वस्तू खरेदी केंद्र, वस्तू वहन, परिवहन विभागाचे नोटाबंदीमुळे काय नुकसान झाले आहे. याचा ग्राऊंड रिपोर्टच शासनाकडे नाही. बँकांतील व्यवहार, एटीएमवरील रांगा, प्लास्टिक मनीचा गवगवा. यापलीकडे कुठलीही चर्चा सध्या तरी आर्थिक क्षेत्रासह नागरिकांमध्ये नाही.

मराठवाड्यात ६२ लाखांच्या आसपास शेतकरी आहेत. पावणेदोन लाखांच्या आसपास सर्व स्तरातील व्यापाऱ्यांचा आकडा आहे. ७६ बाजार समित्या, आठ मोठ्या अडत बाजारपेठा, ७६ लहान अडत व्यापार केंद्रे आहेत. तसेच एसटीचे आठ मुख्य बसस्थानक आणि ७६ तालुकानिहाय बसस्थानकांचा व्यवहार मंदावला आहे. याशिवाय खाजगी ट्रान्सपोर्ट, टॅक्सी, रेल्वे प्रवासावरही नोटाबंदीचा परिणाम झालेला आहे. अंदाजे ३०० आठवडी बाजार आणि १५० च्या आसपास भाजीमंडईमधील आवक जवळपास बंद असल्यासारखी आहे. आठवडी बाजार भरताहेत; परंतु त्यामध्ये चिल्लर चलन नसल्यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत असल्याचे दिसते आहे.

### आज व्हिडिओ कॉन्फरन्स



राज्यातील सर्व प्रशासकीय विभागांची सोमवारी दुपारी १२ वा. चलन तुटवड्यामुळे बाजारात झालेल्या आर्थिक परिणामांच्या अनुषंगाने व्हिडिओ कॉन्फरन्स विभागीय आयुक्तालयात होणार आहे. यासाठीचा तातडीचा आदेश १९ नोव्हेंबर रोजी वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव डी.के.जैन यांनी जारी केला आहे. विभागीय प्रशासन एका दिवसात मराठवाड्यातील आर्थिक उलाढालीचे काय वास्तव मांडणार याकडे लक्ष आहे.

### ३० टक्क्यांवर उलाढाल

- मराठवाड्यातील सर्व स्तरातील उलाढाल ३० टक्क्यांवर आल्याचा अंदाज आहे. दिवसाकाठी १०० ते १५० कोटींच्या आसपास विभागात सर्व व्यवहार होण्याचा अंदाज आहे. तो व्यवहार ठप्प झाल्यासारखाच आहे. पेट्रोलपंप, मेडिकल, हॉस्पिटल, ट्रान्सपोर्टचे थोडेफार व्यवहार चालू आहेत. दोन-चार दिवसांपासून परिस्थिती बदलते आहे, असे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अजय शहा यांनी सांगितले.

# हैं तय्यार हम...

**नाव नोंदणी व सहभागासाठी**

www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

In association with SAFFRON LANDMARKS

Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME AN ISO 9001:2015 CERTIFIED COMPANY




**लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद-गोल्ड डिस्ट्रिक्ट...**
(डावीकडून उभे) राहुल दाशरथे, प्रसन्न उगले, किशोर ललवाणी, सन्निध म्हस्के, विलास पाटणी, अमोल गोधा (अध्यक्ष), सुदेश चुडीवाल, प्रवीण काला, अजय पाटणी, महेश ताहिलरमाणी, मनीष उदावंत.



**ड्रीम्स क्रियेशन ॲडव्हरटायझिंग प्रा. लि....**
(डावीकडून उभे) तेजस्विनी चौधरी, वनश्री तोकलवार, जान्हवी तीळवणकर, शेख हबीब (सीईओ), रसिका पंतोजी, रुणाली रामेकर, (बसलेले डावीकडून) सागर चौहान, चंदनसिंग खोलवाल, नंदलाल कोल्हापुरे, एजाज फारुकी, अबूबकर, झुल्फेकार अली.




**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट..** (डावीकडून)
अजय राजपूत, रझा कुरेशी, मिर्झा मसूद, दीपक गर्कल, स्वप्नील श्रॉफ, पुरुषोत्तम वर्मा, सुनील भाले (अध्यक्ष), नीरज बडजाते, संजय पाठे, लक्ष्मीकांत सुर्वे, प्रदीप देशपांडे, स्वप्नील पारगावकर आणि अविनाश पवार.

Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल, स्थापना वर्ष : १९९५, गेवराई तांडा, पैठण रोड, औरंगाबाद | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION

Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE LIFE BEGINS HERE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (I) pvt.ltd | Partner

# ३२०० आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेना

**सरकारी अनास्था :** वाटपासाठी हवेत ४.२५ कोटी; वरिष्ठांची बेफिकीरी कारणीभूत

राम शिनगारे ● औरंगाबाद

समाजकल्याण विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तींचे साडेबारा कोटी रुपये वर्षभरापासून थकले आहेत. याच वेळी उच्च माध्यमिक ते पदव्युत्तरचे शिक्षण घेत असलेले ३२०० आदिवासी विद्यार्थी हक्काच्या शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यात सरकारी अनास्था आणि विभागातील वरिष्ठांची बेफिकीरी कारणीभूत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

केंद्र आणि राज्य सरकार आदिवासी समाजाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी देत असल्याच्या घोषणा वारंवार करण्यात येत असतात. मात्र, औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, बीड आणि परभणी जिल्ह्यांतील ३२०० आदिवासी विद्यार्थी विविध योजनेतील शिष्यवृत्तींच्या लाभापासून वंचित आहेत. २०१५-१६ या शैक्षणिक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभागाने चार जिल्ह्यांतील २२९४ विद्यार्थ्यांना २.७१ कोटी रुपयांचे वाटप केले. तर उर्वरित ३२०० विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वाटपासाठी ४.२५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. हा निधी राज्य सरकारकडून मिळाला नसल्याचे उघडकीस आले आहे. औरंगाबाद विभागातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थकलेली असताना इतर विभागातील परिस्थितीही यासारखीच असल्याचे सूत्रांनी सांगितले. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सरकारने निधीची तरतूद केलेली आहे. परंतु अर्थ विभाग, विभागीय आयुक्तालय आणि आदिवासी विभागातील समन्वयाच्या अभावासह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे आदिवासी विद्यार्थी शिष्यवृत्तींपासून वंचित असल्याचे एका कर्मचाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर 'लोकमत'शी बोलताना सांगितले. दरम्यान, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी जी. एन. फुंदे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी बोलण्यास नकार दिला.

### विद्यार्थ्यांसाठीच्या योजना



- आदिवासी विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती, मॅट्रिकेतर शिक्षणासाठी शिक्षण फी व परीक्षा फी, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती, व्यावसायिक अभ्यासक्रम निर्वाह भत्ता, पुस्तकपेढी योजना इत्यादी.

समाजकल्याण विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती राज्य सरकारने थकवल्या आहेत. यातच गोरगरीब आदिवासी विद्यार्थ्यांचे पैसे दिले नाहीत. हा आदिवासींवरील अन्याय आहे. या विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी तीव्र आंदोलन करण्यात येईल.

-**राहुल तायडे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस

# चोरट्याकडून तब्बल नऊ दुचाकी केल्या जप्त

**औरंगाबाद : शहरासह** ग्रामीण भागात दुचाकी चोरणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला ग्रामीण पोलिसांच्या दरोडा प्रतिबंधक पथकाने अटक केली. या चोरट्याकडून चोरीच्या ९ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.

सिल्लोड ते जळगाव रोडवरील एका धाब्यासमोरुन शेख मुक्तार यांची मोटारसायकल १६ नोव्हेंबर रोजी चोरीला गेली होती. याप्रकरणी १८ नोव्हेंबर रोजी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक नवीनचंद्र रेड्डी यांनी पोलीस अधिकाऱ्यांना सूचना केल्या. रेकॉर्डवरील सराईत चोरटा अनिल त्रिंबक दांडगे (रा.अंभई, ता. सिल्लोड) हा वेगवेगळ्या कंपनीच्या दुचाकी वापरत असल्याची माहिती मिळाली. त्याने गुन्ह्याची कबुली देत विविध ठिकाणी दुचाकी चोरी केल्याचे सांगितले. औरंगाबाद शहरातही दुचाकी चोरी केल्याचे सांगितले. त्याने चोरलेल्या ९ मोटारसायकली जप्त केल्या. सुमारे दीड लाखाची ही वाहने असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## सेवापुस्तिकांची पडताळणी करा

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य आरोग्य कर्मचारी संघटनेच्या (हिवताप) औरंगाबाद शाखेची बैठक जिल्हा हिवताप अधिकारी अनिल पाटील यांच्या दालनात झाली. यावेळी सेवापुस्तिका अद्ययावत करून लेखा कोषागार कार्यालयातून पडताळणी करणे, जी.पी.एफ.चा प्रस्ताव आठ दिवसांत निकाली काढणे आदी मागण्या करण्यात आल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष विजय मोहरकर, सरचिटणीस सतीश ताजी, उपाध्यक्ष काकासाहेब पाटील शेळके, विजय चौधरी, गजानन देशपांडे, एस. एम. चव्हाण, विनायक चव्हाण, शेख इम्रान, जावेद पटेल उपस्थित होते.

# मुख्याध्यापकांना आता स्मार्ट फोन घ्यावाच लागेल !

**शिक्षण सभापतींचा निर्णय :** 'स्ट्रॉर्म' हजेरी पद्धत दुर्लक्षित करणे नडले; नोटिसा बजावण्याचे आदेश

**औरंगाबाद : जिल्हा** परिषदेचे जवळपास दोनशेहून अधिक मुख्याध्यापक 'स्ट्रॉर्म' या आधुनिक हजेरी पद्धतीशी जोडलेले नाहीत. काही जणांकडे 'स्मार्ट फोन' आहे; पण इंटरनेट घेतलेले नाही. काही जणांकडे स्मार्ट फोनही आहे. इंटरनेटही आहे; पण ते ज्या शाळेवर कार्यरत आहेत. त्या परिसरात मोबाईलचे नेटवर्कच नाही. काही जणांनी जाणीवपूर्वक नवीन हजेरी पद्धत नाकारली, अशा मुख्याध्यापकांना नोटिसा बजावण्याचे आदेश शिक्षण सभापती विनोद तांबे यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना दिले.

शनिवारी जिल्हा परिषदेत शिक्षण विषय समितीची बैठक झाली. या बैठकीत शिक्षणाधिकारी आर. एस. मोगल यांनी 'स्ट्रॉर्म' या आधुनिक हजेरी पद्धतीचा लेखाजोखाच मांडला. शिक्षक जेव्हा सकाळी शाळेत येतात. त्यावेळी संबंधित मुख्याध्यापकांनी हजेरी रजिस्टरवर शिक्षक हे स्वाक्षरी करत असताना मोबाईलवर फोटो काढून तो केंद्रप्रमुखांना पाठवायचा. केंद्रप्रमुखांनी तो फोटो गटविकास अधिकाऱ्यांना पाठवायचा. गटविकास अधिकाऱ्यांनी तो पुढे शिक्षणाधिकारी आणि शिक्षणाधिकाऱ्यांनी तो शिक्षण सभापतींना पाठवायचा. यासाठी मोबाईलवर व्हॉटस् ॲप ग्रुप तयार करण्याच्या सूचना दिवाळीच्या सुटी सुरु होण्याअगोदरच सर्वांना देण्यात आलेल्या होत्या. सुट्यानंतर १५ नोव्हेंबरपासून शाळा नियमित सुरु झाल्या. तेव्हापासून 'स्ट्रॉर्म' हजेरी पद्धत अमलात आणली आहे.

तथापि, जे शिक्षक शाळेत उशिराने येतात. जे विना परवानगी गैरहजर आहेत, अशा सर्व शिक्षकांचा अहवाल गटशिक्षणाधिकाऱ्यांनी रोज शिक्षणाधिकारी आर. एस. मोगल यांना सादर करणे बंधनकारक आहे. शिक्षण सभापती तांबे यांनी जे मुख्याध्यापक ग्रुपमध्ये सक्रिय नाहीत, त्यांच्याविषयी नाराजी व्यक्त करत नोटिसा बजावण्याचे आदेश दिले.

### ग्रुपवर सक्रिय मुख्याध्यापक

- औरंगाबाद तालुक्यात जि.प.च्या २५३ शाळा आहेत. यापैकी १४९ मुख्याध्यापक हे ग्रुपला जोडलेले आहेत. फुलंब्री तालुक्यात १९८ शाळा असून १४९ मुख्याध्यापक, सिल्लोड तालुक्यात ३०४ शाळा असून २९२ मुख्याध्यापक, गंगापूर तालुक्यात २४० शाळा असून २३२ मुख्याध्यापक, सोयगाव तालुक्यात ९५ शाळा असून ८३ मुख्याध्यापक, कन्नड तालुक्यात ३१६ शाळा असून तेथील सर्व मुख्याध्यापक, पैठण तालुक्यात २५१ शाळा असून २४२ मुख्याध्यापक, वैजापूर तालुक्यात ३२६ शाळा असून २५३ मुख्याध्यापक, तर खुलताबाद तालुक्यात ११० शाळा असून १०३ मुख्याध्यापक हे केंद्रप्रमुखांसोबत व्हॉटस् ॲप ग्रुपला जोडलेले आहेत.

# प्रल्हाद पै यांनी दिला जीवनातील 'सुखाचा पासवर्ड'

**औरंगाबाद : कॉम्प्युटरला** पासवर्ड दिल्याशिवाय तो सुरु होत नाही, तसेच जीवनात सुखी होण्यासाठी पासवर्डची गरज असते. तुम्ही दुसऱ्याचे शुभचिंतन करा, दुसऱ्यांना सुख द्या, कृतज्ञता व्यक्त करा, कोणी केलेला अपमान विसरून जा, राग, लोभ, मत्सर सोडून द्या, हीच 'द्या' व 'सोडून द्या' वृत्ती सतत मनी बाळगली तर जीवनात आपोआप समाधान, शांती, सुख लाभेल. आपल्या कॉम्प्युटरला वन, टू, थ्री असे पासवर्ड न देता 'ग्रेट फुल @ ऑल' असा सुखाचा पासवर्ड द्या, जेणेकरून सतत हा पासवर्ड तुमच्या मनात सर्वांबद्दल कृतज्ञतेचा भाव निर्माण करील, असा सुखी जगण्याचा संदेश गुरु प्रल्हाद पै यांनी उपस्थितांना दिला.

सद्गुरु वामनराव पै यांच्या जीवनविद्या मिशनच्या हीरक महोत्सव वर्षांतर्गत रविवारी 'सुखाचा पासवर्ड' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सिडकोतील संत तुकाराम नाट्यगृहात 'जीवनातील सुखाचा पासवर्ड' जाणून घेण्यासाठी शहरवासीयांनी गर्दी केली होती. नाट्यगृह संपूर्ण हाऊसफुल झाले होते. शिवाय बाहेरील हॉलमध्ये ठेवलेल्या खुर्च्याही भरल्या होत्या.

अनेकांनी या गुरुमार्गदर्शनाचा सोहळा एलईडी स्क्रीनवर पाहिला. 'स्थिर मन सुखाचे सागर तर चंचल मन दु:खाचे आगर' या एका वाक्यात प्रल्हाद पै यांनी सर्वांना जीवन कसे जगावे सांगितले. दुसऱ्याचे शुभचिंता, बघा सुख तुमच्याकडे आपोआप येईल. आपल्या आई, वडील, पत्नी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करा. आपण कधीच कोणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत नाहीत. पण दुसऱ्यांकडून त्याची अपेक्षा ठेवतो, हे चुकीचे आहे. ज्यांनी आपल्यासाठी खूप काही केलेले असते त्यांना आपण विसरतो. कृतज्ञतामुळे माणसं जोडली जातात. त्यातून बळ आणि नवशक्ती मिळते. आपल्या कॉम्प्युटरवरील पासवर्ड असा बनवा की तो सतत तुम्हाला 'कृतज्ञता' चे स्मरण करून देईल. दुसऱ्यांना सुख देण्यातच स्वत:चे सुख सामावले आहे, असा मौलिक सल्ला प्रल्हाद पै यांनी दिला. व्याख्यानानंतर अनेकांनी आपल्या मनातील शंका विचारल्या. त्यांचे समर्पक उत्तरे पै यांनी दिली. विश्वप्रार्थना म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.



जीवनविद्या मिशनच्या हीरक महोत्सव वर्षानिमित्त रविवारी सिडकोतील संत तुकाराम महाराज नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात 'सुखाचा पासवर्ड' एकचिताने जाणून घेताना नागरिक. मार्गदर्शन करताना प्रल्हाद पै.

### प्रल्हाद पै यांचा संदेश

- आपण माणसामध्ये 'देव' बघायला शिकले पाहिजे.
- संकटात, दु:खात जो मदत करतो तोच खरा 'देव'.
- महत्त्वाकांक्षा बाळगा, पण त्यास कृतज्ञतेचे अधिष्ठान हवे.
- कार्यकर्त्यांनो स्वत:चे घर सांभाळून दुसऱ्यांना मदत करा.
- बेमुदत संप केल्याने कंपनी बंद पडते अन् बेमुदत दु:ख वाट्याला येते.
- संप, सत्याग्रह करा, पण शांततेच्या मार्गाने.
- आपण जिथे काम करतो त्या संस्थेबद्दल, मालकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करा.
- प्रेमाची 'घंटी'वाजली म्हणून प्रेम करु नका. सावधपणे प्रेम करा.
- 'दिल्याने होत आहे रे आधी दिलेची पाहिजे' हा नवविचार मनी बाळगा.
- नोटाबंदीमुळे ओरड होत आहे, पण देशभक्तीसाठी थोडा त्रास सहन करण्याची तयारी ठेवा.

### लोकमततर्फे सत्कार

- जीवनविद्या मिशनचे गुरु प्रल्हाद वामनराव पै यांच्या कार्याचा गौरव करुन लोकमततर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यंदा मिशनचे हीरक महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून लोकमतचे संपादक चक्रधर दळवी, सहायक वरिष्ठ उपाध्यक्ष (वितरण) वसंत आवारे व सहायक वरिष्ठ उपाध्यक्ष (प्रशासन) बी. ए. मुळे यांनी प्रल्हाद पै यांचा सत्कार करताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.




